# बृहन्मुंबई महानगरपालिका
# देवनार पशुवधगृह
# जाहिरात

**महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मसुदा**

मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र.एमजीसी/एफ/९८३२ दि. २६.०२.२०२६ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील पशुवैद्यकीय आरोग्य खात्याच्या अखत्यारित असलेल्या देवनार पशुवधगृहात 'पशुवैद्यकीय अधिकारी' या संवर्गाची पदे कंत्राटी तत्वावर अकरा महिन्याच्या कालावधीकरीता भरावयाची आहेत. त्यासाठीची निवड यादी बनविण्याकरीता खालील नमुद केलेल्या अर्हता व अटींच्या पुर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवाराने स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता व अटींची पुर्तता करत असून पात्र आहेत.

**पदाचे नाव- “पशुवैद्यकीय अधिकारी" (कंत्राटी तत्वावर अकरा महिन्याच्या कालावधीकरीता) एकूण पदे – ११**

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

- अर्जाचे शुल्क रुपये ७९०/- +१८ % जीएसटी रु.१४३/- = एकुण रु.९३३ / सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.
- अर्जाचे विहित मुल्य देवनार पशुवधगृहातील लेखा विभागात भरुन त्याची पावती अर्जासोबत जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
- **उमेदवाराने नियुक्ती नंतर ०७ दिवसांच्या आत रु. ९०,०००/- इतकी अनामत रक्कम रुजू होण्यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पुर्व किंवा एम/पश्चिम कार्यालयात भरणे आवश्यक आहे.**
- **अनामत रक्कमेचा परतावा कंत्राट कालावधी पूर्ण झाल्यावर करण्यात येईल.**
- रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबतचे , भरती प्रक्रिया अंशत: / पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
- उपरोक्त पदांची कंत्राट तत्वावर नियुक्ती अकरा महिन्यांच्या कालावधीकरीता असून त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर १७९ दिवसानंतर एक दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.
- कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवा समाप्त केली जाईल.
- बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानियमावलीनुसार ही नेमणुक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास सदर उमेदवार प्राप्त राहणार नाहीत.

- नेमणूक केलेल्या उमेदवारास कंत्राटी तत्वावरील नेमणूक नियमित स्वरुपात करण्यासाठी कोणताही दबाव किंवा न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत
- अर्जदाराने अर्ज स्वहस्ताक्षरात भरावा, अपूर्ण अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर लावण्यात यावा.
- पत्रव्यवहारकरीता उमेदवाराने आपला घरचा पत्ता पिन कोडसहीत अर्जात पूर्ण भरावा. तसेच संपर्क साधण्यासाठी भ्रमणध्वनी क्रमांक,ई-मेल आयडी नमूद करावेत.
- पात्र उमेदवारांना कंत्राटी नियुक्ती देण्यापूर्वी संबंधित पोलीस ठाण्याकडून चारित्र्य व पुर्वचारित्र प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.
- उमेदवाराचे विवाह झाले असल्यास विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
- उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
- उमेदवारास वार्षिक असणा-या ०६ नैमित्तीक रजेशिवाय इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाही.
- नियुक्तीच्या वेळी उमेदवाराकडुन रु. ५००/- बॉड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.
- कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने १५ दिवसांची पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
- उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
- निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
- नियुक्त कंत्राटी उमेदवार दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विनावेतनी गैरहजेरी करण्यात येईल.
- निवड झालेल्या उमेदवारांमधून ११ उमेदवारांच्या नेमणूका करुन आणखीन १५ उमेदवार प्रतिक्षायादी वर ठेवण्यात येतील. एक वर्षाच्या कालावधीत ११ उमेदवारांपैकी कोणीही सेवा सोडून गेल्यास प्रतिक्षायादीतील उमेदवारांमधून नेमणूका करण्यात येतील.
- सदर पदासाठी ५० पेक्षा अधिक पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्ता यादीनुसार केवळ प्रथम २५ पात्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीकरिता बोलविण्यात येईल.

**मानधन**

एकूण रु. ९०,०००/- प्रति महिना

**<u>निवडीचे निकष</u>**

**विहित अर्हता - उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास**

1. उमेदवार पशुवैद्यक विज्ञान शाखेचा मान्यताप्राप्त विद्यापिठाचा पदवीधारक असावा.उमेदवार राज्य पशुवैद्यक / भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा १९८४ अंतर्गत नोंदणीकृत असावा.
2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
3. उमेदवार 'डी.ओ.ई.ए.सी.सी' सोसायटीचे 'सी.सी.सी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर', स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी' किंवा 'जी.ई.सी.टी' चे प्रमाणपत्रधारक असावा. किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली 'एमएससीआयआटी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवासमाप्त करण्यात येईल.

**<u>वयोमर्यादा</u> - उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास**

पशुवैद्यकीय अधिकारी या संवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. (मागासवर्गीय उमेदवारांवाच्या बाबतीत कमाल ४३ वर्षे असावे.)

**<u>निवडीची कार्यपद्धती -</u>**

- Walk-in Selection पध्दतीने पदवी परिक्षेतील गुण विचारात घेऊन उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- उमेदवाराने पशुवैदयकीय शास्त्रातील मान्यताप्राप्त विदयापीठातील पदवी एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास दुस-या प्रयत्नासाठी 1 टक्का गुण, तिस-या प्रयत्नासाठी 2 टक्के गुण एकूण गुणामधून वजा केले जातील. तीन पेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराचा पशुवैदयकीय अधिकारी या पदासाठी विचार केला जाणार नाही.
- मौखिक चाचणी / मुलाखत घेण्यात येणार नाही.
- दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण असल्यास उमेदवाराच्या वयाच्या ज्येष्ठतेला प्राधान्य देण्यात येईल.

## <u>उमेदवारांनी टक्केवारीनुसार भरतीसाठी हजर रहावयाचे वेळापत्रक</u>

| अ.क्र | पशुवैद्यकीय शास्त्रातील मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी | भरतीच्या ठिकाणी हजर राहण्याची | |
|---|---|---|---|
| | | तारीख | वेळ |
| १. | ७० टक्के किंवा अधिक टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | दि.१८.०५.२०२६ | सकाळी ११:०० ते दुपारी ०१:०० |
| २. | ५० टक्के किंवा अधिक टक्केवारी प्राप्त झालेले उमेदवार | दि. १८.०५.२०२६ | दुपारी ०२:०० ते सायं ०४:०० |

भरतीसाठी वर नमूद केलेल्या वेळेपर्यंत उपस्थित असलेल्या उमेदवारांना भरतीच्या स्थळाच्या आवारात प्रवेश दिला जाईल. सदर वेळेनंतर उपस्थित होणा-या उमेदवारांना भरती स्थळाच्या आवारात प्रवेश दिला जाणार नाही.

**<u>अर्ज सादर करण्याची पद्धत सर्वसाधारण सूचना</u>**

उमेदवारांनी संकेतस्थळावरील जाहिरातीतील नमूद अटी व शर्तीनूसार आपले अर्ज व विहित शुल्क महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह कार्यालयात खाली नमूद केलेल्या पत्त्यावर दि. २४.०४.२०२६ ते दि. १५.०५.२०२६ पर्यंत सकाळी ११:०० ते सायं ५:३० पर्यंत सादर करावेत.

**<u>कार्यालयाचा पत्ता</u> :-**

महाव्यवस्थापक,
देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय,
गोवंडी रेल्वे स्थानकासमोर,
गोवंडी, मुंबई ४०० ०४३.
दुरध्वनी क्र. २५५६३२८४-८८
फॅक्स नं - २५५१५६९.
ई-मेल आयडी - gm.deonar@mcgm.gov.in

- **अर्धवट किंवा अपुर्ण भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**
- **विहित वेळेनंतर सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

स्वाक्षरी /-
दि.२७.०३.२०२६
**(डॉ. क. अ. पठाण)**
**महाव्यवस्थापक**
**पशुवैद्यकीय आरोग्य खाते**

स्वाक्षरी /-
दि.२०.०४.२०२६
**(श्री. विनायक विसपुते)**
**उप आयुक्त (विशेष)**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)**
**(पशुवैद्यकीय अधिकारी पदाकरिता)**
**(कंत्राट पध्दतीने)**

**महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह मुंबई 400043**
**अर्जाचा नमुना**

१) (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम) :
(ब) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नांव :
(क) विवाहित महिलांच्या बाबतीत :
त्यांचे विवाहापूर्वीचे नांव

२) (अ) कायम पत्ता (पोस्टल पिनकोडसहीत) :

(ब) दूरध्वनी क्र. (एस.टी.डी.क्रमांकासह)

भ्रमणध्वनी क्र.

ई-मेल आयडी

३) लिंग : पुरुष ☐ स्त्री ☐ तृतीयपंथी ☐

४) अ) जन्मदिनांक : दिनांक ☐☐ महिना ☐☐ वर्षे ☐☐☐☐

ब) अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय : ……. वर्षे ………. महिने ……..दिवस

५) उंचीः फूट____इंच, वजनः_____कि.ग्रा., शरीराची ठेवणः किरकोळ/मध्यम/सुदृढ/वर्णः____ नेत्र वर्णः ____ वैयक्तिक खूण

६) (अ) शैक्षणिक अर्हता :

| शैक्षणिक अर्हता | शालान्त परीक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नांव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | एस.एस.सी./एच.एस.सी.परिक्षेतील मराठी विषयातील गुण | | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | मराठी विषयातील प्राप्त गुण | पैकी | |
| एस.एस.सी | | | | | | | |
| एच.एस.सी. | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बी.व्ही.एस.सी. ॲन्ड ए.एच. | | | | | | | |

७) उमेदवार सध्या नोकरी करत आहे किंवा नाही – होय/नाही
असल्यास त्याबाबतचा तपशील - ---------------------------------------------------------------------------

८) राज्य पशुवैद्यक/भारतीय पशुवैद्यकीय कायदा 1984 अंतर्गत नोंदणी असणे : ----------------------------------------
आवश्यक असून नोंदणी केलेला नोंदणी क्रमांक नमूद करावा. (प्रत जोडावी)

९) संगणक विषयक ज्ञान : एम.एस.सी.आय.टी. होय/नाही. : ________________________________________
किंवा शासनाने विहित केलेले संगणकविषयक अभ्यासक्रम उत्तीर्ण

१०) (अ) उमेदवार खेळाडू आहे काय ? : ______________________________
(ब) असल्यास प्रमाणपत्र द्यावे. : _______________________________

११) स्थानिक पोलीस स्टेशनचा पत्ता (आयुक्त / अधीक्षक कार्यालय) : ________________________

१२) अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? : होय/नाही.
ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.
क) उमेदवारा विरूध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? असल्यास तपशील द्यावा.

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातील दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी --------------------------------- पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

दिनांक :
ठिकाण

आपला / आपली विश्वासू ,

अर्जदाराची सही/-
(अर्जदाराचे नांव )

सोबत : १)
२)
३)
४)